**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ बैठकीचे इतिवृत्त दि. १६/११/२०१८**

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर किती कार्यरत आहेत आणि संचमान्यतेनुसार किती मान्य आहेत. या पदाची माहिती मागविली आहे. त्यानुसार कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, व सातारा या पाच जिल्ह्यातील प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर संख्या किती कार्यरत आहे. याची पद नामाशी संख्यांची माहिती देण्यात यावी. | शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांचेकडून वेतन घेणाऱ्या प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांची यादी पदनामासह संघटनेस आपल्या जिल्हास्तरावर दि. ३०/११/२०१८ रोजी होणाऱ्या संघटना सभेमध्ये उपलब्ध करुन द्यावी. | संघटना स्तरावर | ३०/११/२०१८ |
| २ | संचमान्यता २०१८-१९ च्या मध्ये प्रयोगशाळा परिचर हे पद कार्यरत मध्ये व मंजूर पदामध्ये दाखविण्यात यावे. | शिक्षणाधिकारी यांनी सन २०१८-१९ च्या संचमान्यतेमध्ये ज्या शाळांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोग शाळा परिचर असे मंजूर पदे आहेत. तेथे प्रयोगशाळा परिचर ही पदे वर्ग ४ मध्ये कार्यरत न दाखवता ती पदे स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावीत. अशा सूचना शिक्षणाधिकारी यांनी शाळा मुख्याध्यापक तसेच अधीक्षक, वेतन पथक यांना जिल्हास्तरावरील होणाऱ्या संघटना सभांमध्ये द्याव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ३ | २४ वर्षानंतरची दुसरी वेतनश्रेणी यांना लागू करण्यात यावी मूळ कालबध्द पदोन्नती अश्वासीत प्रगती योजना ऐवजी अश्वासित प्रगती योजनेमध्ये फक्त आम्हाला विशेष वेतन देण्याची तरतूद आहे. तेव्हा राज्य शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे विनाअट प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांना मूळ कालबध्द पदोन्नती लागू करण्यात यावी. | धोरणात्मक बाब आहे. संघटनेने याबाबत शासनस्तरावर होणाऱ्या बैठकीमध्ये विषय मांडावा. | संघटना स्तरावर | -- |
| ४ | कोल्हापूर विभागीय पाच जिल्ह्यामधील मागील मिटींगमध्ये ठरल्यानुसार प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांची एकदिवसीय कार्यशाळा लावली नसून ती लावण्यात यावी. कारण नवीन अभ्यासक्रमक ९ वी १० वी चा बदलला असल्याने एक दिवसीय कार्यशाळा होणे गरजेचे आहे. | याबाबत जिल्हास्तरावर संघटनेने शिक्षणाधिकारी यांचेशी चर्चा करुन तज्ञ मार्गदर्शकाद्वारे एक दिवसीय कार्यशाळा/उद्‌बोधान वर्गाचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी/ संघटना स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | एक दिवसीय कार्यशाळा होणे गरजेचे आहे. | | | |
| ५ | प्रयेगशाळा सहाय्यक यांना २०००/- रु. ग्रेड पे. सुरवातीला दिला जातो. १२ वर्षानंतरने २४००/- ग्रेड पे द्यावा यासाठी कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली व सातारा या पाच जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्या-त्या जिल्ह्यातील सिनीअर ऑडिटर यांच्याबरोबर आमच्या महासंघाची चर्चा करण्यासाठी बैठक लावण्यात यावी. | याबाबत संघटनेने राज्यस्तरीय बैठकीमध्ये विषय मांडावा. तसेच वेतन आयोगाकडे निवेदन सादर करावे. | संघटना स्तरावर | -- |
| ६ | जिल्हास्तरीय व विभागस्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजन करतेवेळी आमच्या महासंघाच्या जिल्हा पदाधिकारी व महासंघाच्या पदाधिकारी यांना बोलविण्यात यावे. | जिल्हास्तरीय व विभागस्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजन करतेवेळी शिक्षणाधिकारी यांनी महासंघाच्या जिल्हा पदाधिकारी व महासंघाच्या पदाधिकारी यांना आयोजनात सहभागी करुन घ्यावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ७ | वेतन पथक मध्ये वैद्यकीय बिले, फरक बिले, फंडाची विविध प्रकरणे यांना होत असलेल्या विलंबाबाबत. | शिक्षणाधिकारी यांनी संघटनेच्या जिल्हास्तरीय बैठकीमध्ये अधीक्षक, वेतन पथक यांना उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे व बैठकीमध्ये वैद्यकीय बिले, फरक बिले, फंडाची बिले इ. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा व प्रलंबित प्रकरणांची तात्काळ निर्गती करावी. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| ८ | प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षण अधिकारी यांच्याकडून संघटना सहविचार सभा तिमाही घेतली जात नसलेबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावर संघटना सहविचार सभांचे आयोजन नियमितपणे तिमाही होतील याची दक्षता घ्यावी. तसेच दि.३०/११/२०१८ पर्यंत सर्व संघटनांची जिल्हास्तरीय बैठक घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ९ | प्रयोगशाळा परिचर हे पद वर्ग ४ मध्ये असलेतरी हे पद तांत्रिक दर्जाचे आहे. त्यामुळे सेवाज्येष्ठतेनुसार प्रयोगशाळा परिचर या पदनामाने सेवाज्येष्ठता यादी स्वतंत्र करण्यात यावी. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर